# CS(M) EXAM2012

G-DTN-M-NSUA

# MARATHI

## Paper I

## (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

### *INSTRUCTIONS*

***Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.***

***The number of marhs carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi.***

*IMPORTANT : Whenever a question is being attempted, all its parts/sub-parts must be attempted contiguously. This means that before moving on to the next question to be attempted, candidates must finish attempting all parts/sub-parts of the previous question attempted. This is to be strictly followed.*

***Pages left blanh in the answer-book are to be clearly struch out in inh. Any answers that follow pages left blanh may not be given credit.***

## SECTION A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 150 शब्दांत लिहा : *12×5=60*

(a) पुरुषसत्ताक समाजरचनेचा प्रभाव भाषेवर कसा पडलेला दिसतो, ते सोदाहरण वर्णन करा.

(b) मानवेतर जीवांच्या संदेशन पद्धतीला 'भाषा' असे का म्हणता येणार नाही ?

(c) डांगी बोलीचे विशेष सोदाहरण सांगा.

(d) नामाला लिंगविकार कसा होतो, ते स्पष्ट करा.

(e) तमाशाच्या खेळातील 'सोंगाड्या' या पात्राविषयी माहिती द्या.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत द्या : *20×3=60*

(a) लोकसाहित्यात इहतत्त्व कसे प्रतिबिंबित झालेले आढळते, त्याची चिकित्सा करा.

(b) विधिसंबद्ध स्त्रीगीतांची माहिती द्या.

(c) लोकनाट्यातून लोकसंस्कृतीची वैशिष्ट्ये कशी व्यक्त होतात ते साधार लिहा.

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 400 शब्दांत लिहा : *30×2=60*

(a) अव्ययांचे प्रकार सांगून त्यांचे सोदाहरण विवरण करा.

(b) पुढील वाक्यांमधील प्रयोग सप्रमाण स्पष्ट करा :

(i) माझ्या पोटात दुखते

(ii) मी राष्ट्रध्वज फडकाविला

(iii) प्रत्येक जण आश्चर्य व्यक्त करीत होता

(iv) धाडसाने जगावे

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा : *20×3=60*

(a) भाषा आणि समाज यांचा अन्योन्याश्रयी संबंध स्पष्ट करा.

(b) बोली का निर्माण होतात, ते सकारण लिहा.

(c) भाषेचे कालिकभेद करण्यामागील कारणमीमांसा स्पष्ट करून यादवकालीन मराठी भाषेचे विशेष सांगा.

## SECTION B

5. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 150 शब्दांत लिहा : *12×5=60*

   (a) महानुभावांच्या गद्यलेखनाची वैशिष्ट्यें सांगा.

   (b) ऐतिहासिक कादंबरीत इतिहास आणि सत्य यांचे मिश्रण कसे असते, ते साधार लिहा.

   (c) 1960 नंतरच्या मराठी कवितेचे वेगळेपण स्पष्ट करा.

   (d) समाजशास्त्रीय समीक्षा साहित्यकृतीच्या मूल्यमापनास उपयुक्त ठरते, की केवळ आकलनास ? सकारण लिहा.

   (e) 'लेखनगर्भ आत्मनिष्ठा' म्हणजे काय, ते स्पष्ट करा.

6. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 400 शब्दांत लिहा : *30×2=60*

   (a) शाहिरी वाङ्मयाची वैशिष्ट्यें सोदाहरण लिहा.

   (b) मराठी कथेच्या विकासातील दिवाकर कृष्ण यांचे स्थान निश्चित करा.

7. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 250 शब्दांत लिहा : *20×3=60*

   (a) रघुनाथपंडितांच्या काव्याची वैशिष्ट्यें सांगा.

   (b) प्रादेशिक कादंबरीकार म्हणून श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांचा परामर्श घ्या.

   (c) दलित साहित्याची चळवळ केवळ साहित्यिक आहे, की ती राजकीय-सामाजिक ही आहे ? साधार लिहा.

8. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 250 शब्दांत लिहा : *20×3=60*

(a) स्वच्छंदतावादाचे स्वरूप स्पष्ट करा.

(b) "कमल देसाई यांचे साहित्य मराठी स्त्री साहित्यातील आधुनिकतेचे प्रत्ययकारी दर्शन आहे." — चर्चा करा.

(c) साहित्याच्या आकलनास कोणती समीक्षापद्धती अधिक उपयुक्त ठरते, ते साधार लिहा.